# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईमधील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स पोलीस ठाणे येथे तिहेरी तलाक विरोधातील तक्रार नोंदवण्यास नकार दिल्याबाबत**

**(१) ५९४ (२७-०३-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स पोलीस ठाणे येथे मुस्लीम महिला तिहेरी तलाक विरोधात तक्रार करण्यास गेली असता पोलीस अधिकाऱ्याने तक्रार नोंदवण्यास नकार दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एफआयआर दाखल करून न घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला मानवाधिकार आयोगाकडून नोटीस पाठविली गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून तिहेरी तलाक बाबतचा कायदा संमत असतानाही एफआयआर दाखल करून न घेणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०५-२०२१) :** (१) हे खरे नाही.

श्रीमती खातुन शेख यांच्याकडून बीकेसी पोलीस ठाण्यात बळीत महिला श्रीमती निलोफर सय्यद यांच्या वतीने तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. परंतू श्री. निलोफर सय्यद या प्रत्यक्ष बीकेसी पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल (FIR) देण्याकरिता हजर झालेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

दि इंडियन एक्सप्रेस या वृत्तापत्रामधील दिनांक ३०.१२.२०१९ रोजी “No FIR Lodged despite Visits to police station “या मथळ्याखाली प्रसिध्द झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने राज्य मानवी हक्क आयोग यांनी Suo-Motu याचिका दाखल करुन स्वतंत्र व सखोल चौकशी करुन दिनांक २७.०१.२०२० रोजी सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत समन्स जारी केले होते. याबाबत राज्य मानवी हक्क आयोगास दिनांक २७.०१.२०२० रोजी अहवाल सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई मालाड पूर्वेला असलेले दिंडोशी पोलीस ठाणे निवासी इमारतीमध्ये असल्याबाबत**

**(२) ६१० (२७-०३-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) पूर्वेला असलेले दिंडोशी पोलीस ठाणे हे एका निवासी इमारतीमध्ये आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालाड पूर्वेला पोलीस ठाण्यासाठी राखीव असलेल्या भूखंडाचा ताबा घेऊन सदर ठिकाणी पोलीस ठाणे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत सदर भूखंडाचा ताबा न घेण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर भूखंडाचा ताबा घेऊन उक्त ठिकाणी पोलीस स्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई विकास आराखडा २०३४ मध्ये न.भू.क्र.३३५, ३३६, ता.मालाड, मालाड (पू.), मुंबई हा भूखंड दिंडोशी पोलीस ठाणेकरिता आरक्षित आहे. सदर भूखंड खाजगी असल्याने भूखंडाचा ताबा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून पोलीस विभागास प्रदान करण्याची कार्यवाही अद्याप केली नाही. याबाबत महसूल विभाग व नगर विकास विभाग यांच्याशी पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

---

**(ता. जिंतूर जि. परभणी) येथील जिल्हा पषिदेच्या अखत्यारित येणा-या व अन्य काही गावांच्या रस्त्यांच्या बांधकामांबाबत**

**(३) ८९९ (१०-०४-२०२०). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून परभणी जिल्हयातील जिंतूर तालुक्यातील जि.प.च्या अखत्यारित येणा-या कोक, दुधगाव, कैसाडी व अन्य काही गावांच्या रस्त्यांची कामे करण्यात आली असून या कामांच्या दर्जेचा कालावधी ५ वर्षाचा होता तरीही १ वर्षाच्या आतच हे रस्ते खराब झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक रस्त्यांना आतापर्यंत व्हीआर क्रमांक उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०२-२०२२) :** (१) परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यातील रामा-२४८ ते कोक रोहीला पिंप्री दुधगाव कौडगाव (खु) कौडगाव (बु) आसेगाव रस्ता हा १६.८० कि.मी. लांबीचा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असून सदर कामाची किंमत रू.८२१.४९ लक्ष इतकी आहे. सदर रस्त्याचे काम प्रगतीत असून साधारणपणे ९० % काम पुर्ण झाले आहे. सदर रस्त्याचे काम प्रगतीत असताना राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून वेळोवेळी तपासणी करण्यात आली असून सर्व तपासणीमध्ये कामाची गुणवत्ता समाधानकारक असल्याचा शेरा दिला आहे. तथापि, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून बांधकाम झालेल्या कोक रोहिला पिंप्री या रस्त्याच्या २.५० कि.मी. लांबीमध्ये अतिजड वाहतुकीमुळे रस्ता क्षतीग्रस्त झाल्याने सदर कामाची वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२० रोजी तपासणी केली असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ नुसार परभणी जिल्ह्यातील जिंतुर तालुक्यातील ८ रस्त्यांना ग्रामीण मार्ग क्रमांक मंजुर आहेत. जिंतुर तालुक्यातील ०२ रस्त्यांना ग्रामीण मार्ग क्रमांक मंजुर करण्यानुषंगाने त्रुटींची पुर्तता करून प्रस्ताव फेरसादर करण्याची कार्यवाही चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वैष्णवदेवी माता मंदिर येथे जादूटोणा, नरबळी, अंधश्रद्धा, अनिष्ट अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्याबाबत**

**(४) १०७२ (२०-०३-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वैष्णवदेवी माता मंदिर येथे जादूटोणा, नरबळी, अंधश्रद्धा, अनिष्ट अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यांतर्गत माहे डिसेंबर, २०१९ शेवटच्या आठवड्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ही घटना ताजी असतानांच डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले नाट्यगृहाजवळच्या बंदिश पॅलेस चौकात करणीच्या उताऱ्यात गुलाल, नारळ, लिंबू, टाचण्या, काळी बाहुली अशा भूतातकीच्या वस्तू ठेवल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही डोंबिवलीत असा प्रकार घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे व याचा सर्वांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) टिटवाळा येथील वैष्णवदेवी माता मंदिर येथे जादूटोणा, नरबळी, अंधश्रध्दा, अनिष्ट अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यांतर्गत माहे मे, २०१९ मध्ये दाखल गुन्ह्याप्रमाणे डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले नाट्यगृहाजवळच्या बंदिश पॅलेस चौकात करणीच्या उताऱ्यात गुलाल, नारळ, लिंबू, टाचण्या, काळी बाहुली अशा भूताकडकीच्या वस्तू ठेवल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) सन २०१५ मध्ये डोंबिवली पो. स्टे. मानपाडा येथे गु.र.क्र. २६७/२०१५ भा.दं.वि. कलम ३६६(अ), ३५४, ३४, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन व अघोरी विद्या प्रतिबंध कायदा (काळा जादू कायदा) कलम ३ सह बालकांचे लैंगिक अत्याचारास प्रतिबंध कायदा, २०१२ चे कलम ३, ७, १६, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश, २०१३ चे कलम २, ११ (क) प्रमाणे पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली होती.

मा.न्यायालयाने दि.१७/११/२०१८ रोजी पाच आरोपींपैकी चार आरोपींना प्रत्येकी सात वर्षे व रु. ५०००/- दंडाची शिक्षा व एका आरोपीची निर्दोष सुटका केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे)येथील नारपोली मधील लीओ किड्स शाळेमध्ये सुरु असलेला मनमानी कारभार**

**(५) ७३६२ (१०-०४-२०२०). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे)येथील नारपोली मधील लीओ किड्स शाळे मध्ये सकाळच्या प्रार्थनेच्या वेळेस विद्यार्थ्यांना CCA व NRC ला समर्थन करा व आपल्या पालकांना आणि विभागात CCA व NRC ला समर्थन करण्यास सांगण्यात आल्याचे दिनांक.०९ जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लीओ किड्स शाळेचे विकास जैन यांच्याविरुद्ध महिला कर्मचाऱ्यावर बलात्कार करण्याचा आरोप असून सदर घटनेबाबत गुन्हाही दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (११-०२-२०२२) :** (१) भिवंडी येथील नारपोली पोलीस स्टेशन आणि प्राथमिक शिक्षण विभाग, भिवंडी-निजामपूर, महानगरपालिका यांचेकडे याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) व (३) विकास जैन यांच्याविरूध्द भिवंडी शहर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५९१/२०१९, भा.दं.वि. कलम ३७६, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

विकास जैन याने त्याच्या कार्यालयात पिडीत महिलेस खाद्य व शितपेयातून गुगीचे औषध देऊन पिडीतेच्या संमतीशिवाय बळजबरीने संभोग करणे, झालेल्या प्रकाराबद्दल वाच्यता न करण्याची व सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यातील रेकॉर्डींग व्हायरल करण्याची धमकी दिल्याने त्याचेविरूध्द दिनांक १८.१२.२०१९ रोजी सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोषारोपपत्र क्रमांक १६/२०२०, दिनांक १२.०२.२०२० अन्वये मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकणामध्ये फळांवर प्रक्रिया करणारा उद्योगांसह विक्रेय वस्तूंसाठी बाजारपेठ सुरु करण्याबाबत**

**(६) ९६३३ (२९-०५-२०२०). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणामध्ये आंबा, काजु, फणस, जांभुळ, करवंद, चिंच, चिकु, केळी, नारळ हया फळांच्या बागा असतानाही फळांवर प्रक्रिया करणारा एकही उद्योग शासनाकडुन सुरु झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, विक्रेय वस्तुंसाठी कोकणात बाजारपेठ नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फळांवर प्रक्रिया करणारा उद्योग तसेच विक्रेय वस्तूंसाठी बाजारपेठ सुरु करण्याबाबत शासनाकडुन कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०८-०२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

सन २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीत केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान या योजनेअंतर्गत कोकणातील एकूण १० प्रकल्पांना अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजनेंतर्गत कोकणातील एकूण ६ प्रक्रिया प्रकल्पांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तसेच, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियांनांतर्गत कोकण विभागात सन २००८-०९ ते २०१९-२० कालावधीत एकूण ३८७ प्राथमिक प्रक्रिया केंद्रांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

कोकण विभागात १९ मुख्य बाजार व ४३ उपबाजार आहेत. यामध्ये ठाणे जिल्हयामध्ये मुख्यबाजार ५ व उपबाजार १०, पालघर जिल्हयामध्ये मुख्यबाजार ३ व उपबाजार ८, रायगड जिल्हयामध्ये मुख्यबाजार ९ व उपबाजार २१, रत्नागिरी जिल्हयामध्ये मुख्यबाजार १ व उपबाजार ४ व सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये १ मुख्यबाजार आहे.

(३) राज्याचे प्रक्रिया धोरण २०१७ अंतर्गत मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना कार्यरत आहे. तसेच, राज्यातील असंघटित व अनोंदणीकृत कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी केंद्र

शासन पुरस्कृत प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना सन २०२०-२१ पासून पुढील पाच वर्षासाठी म्हणजेच सन २०२४-२५ पर्यंत राबविण्यास मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत देशांतर्गत व निर्यात बाजारपेठ वृद्धीसाठी कोकण (रत्नागिरी) विभागात निर्यात सुविधा केंद्रे कार्यरत आहेत. राज्यातील फळ पिकांना थेट विक्री व्यासपीठ उपलब्ध करणेसाठी फळ महोत्सव योजना राबविण्यात येते. दरवर्षी ¨उत्पादक ते ग्राहक थेट विक्री° योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांतर्गत bs.msamb.com हे ऑनलाईन पोर्टल कार्यरत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागठाणा (ता.उमरी जि. नांदेड) येथे वीरशैव लिंगायत मठाधिपती बालयोगी निर्वाणरुद्र पशुपती महाराज यांची हत्या केल्याबाबत

**(७) ११८६४ (१७-०७-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागठाणा (ता.उमरी, जि. नांदेड) येथे वीरशैव लिंगायत मठाधिपती बालयोगी निर्वाणरुद्र पशुपती महाराज यांची निघृणपणे हत्या करण्यात आली असून महाराष्ट्रात धर्मगुरूवर हल्ले होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हत्या करणाऱ्या आरोपीकडून याअगोदर गंभीर घटना घडली असतानाही पोलीस प्रशासनाकडून कारवाई करण्याबाबत दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर प्रकरणातील मुख्य आरोपी शिवानंद लिंगाडे यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच अशा घटना रोखण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-०२-२०२२) :** (१) वीरशैव लिंगायत मठाधिपती बालयोगी निर्वाणरुद्र पशुपती महाराज यांची निर्घृणपणे हत्या केले प्रकरणी एका आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन, उमरी, जि. नांदेड येथे गु. र. नं. ११७/२०२० भा. दं. वि. स. कलम ३०२, ३९४, ३७९, ४५२, २०१, ५०६ प्रमाणे दि.२४/०५/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर आरोपींविरुद्ध मारहाण केले प्रकरणी पोलीस स्टेशन, उमरी, जि. नांदेड येथे गु.र.नं. ८७/२०२० भा.दं.वि.स. कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दिनांक २०.४.२०२० रोजी गुन्हा दाखल आहे. तसेच सदर आरोपीविरुद्ध दि.२४.४.२०२० रोजी पोलीस स्टेशन, उमरी चॅप्टर केस क्रमांक २८/२०२० कलम १०७ फौ.प्र.सं. अन्वये प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली होती.

उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन, उमरीचे तत्कालीन पोलीस निरिक्षक यांनी सदर गुन्हयातील आरोपीतांविरुध्द वेळीच परिणामकारक प्रतिबंधक कार्यवाही केली नाही व त्यांनी पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी म्हणून त्यांचे कर्तव्यात केलेल्या इतर कसुरीच्या अनुषंगाने त्यांना दिनांक १४.७.२०२० रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच त्यांचेविरुद्ध विभागीय चौकशी प्रक्रिया सध्या सुरु आहे.

(४) उक्त प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा अधिकचा तपास सुरू आहे.

नांदेड जिल्ह्यात अशा घटना रोखण्यासाठी वेळोवेळी नाकाबंदी, कोंबिंग ऑपरेशन, ऑल आऊट ऑपरेशन राबवून सक्रिय गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यात येते.

(५) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईत नोकरीकरीता ऑनलाईन फीच्या नावाखाली**
**बेरोजगारांची फसवणूक होत असल्याबाबत**

**(८) १४५४७ (२६-०२-२०२१). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत नोकरीकरीता ऑनलाईन फीच्या नावाखाली बेरोजगारांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरिवली भागातील एका युवतीची १ लाख ३ हजार रुपयांनी फसवणुक केल्याची घटना घडली असून याबाबत बोरिवली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू सायबर गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२५-०८-२०२१) :** (१) व (२) होय

बृहन्मुंबईतील पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील विविध पोलीस ठाण्यात सन २०१९ ते सन २०२१ (जून अखेर पर्यन्त) या कालावधीत नोकरीचे आमिष दाखवून संगणकीय साधनांचा वापर करुन आर्थिक फसवणूक केल्याबाबत दाखल गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| २०१९ | ४३ | ५ | १७ |
| २०२० | ३३ | २ | १२ |
| २०२१ (जून २०२१ अखेर | २४ | ३ | १८ |

दिनांक १३.०४.२०१९ रोजी आरोपी महिला नामे पुजा अग्रवाल हिने तिच्या मोबाईल वरुन फिर्यादी युवतीला फोन करून तुम्हाला महिंद्र अँड महिंद्र कंपनीत जॉब मिळेल तुम्ही naukariways.com या साईटवरुन ॲप्लीकेशन करा असे सांगितले. फिर्यादी यांनी

ॲप्लीकेशन करुन फि भरण्यासाठी डेबिट कार्डवरुन ३० रुपयाचे ट्रान्झेक्शन केले असता फिर्यादीच्या खात्यामधून रु.३०००/- डेबिट झाले त्यानंतर रु.१,०७,९८९/- डेबिट झाले असे एकूण रु.१,१०,९८९/- ट्रान्झेक्शन करुन फिर्यादीची फसवणूक झाली.

(३) फिर्यादी युवतीची फसवणूक झाली म्हणून बोरीवली पोलीस ठाणे येथे गु.र. क्र. २७५/२०१९ कल्म ४२० भा.दं.वि. अन्वये दिनांक २२.०४.२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्यात केलेल्या तपासावरुन सदरचा गुन्हा हा खरा परंतू उघडकीस न आलेला या शिर्षकाखाली कायम तपासावर ठेवून मा.न्यायालयाच्या दिनांक ०६.०३.०२०२० रोजीच्या आदेशावरुन गुन्ह्याचे अ वर्गीकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चेंबूर (मुंबई) परिसरात दीड कोटी रुपयांचा अपहार करुन फसवणूक केल्याबाबत

**(९) १४८४२ (२६-०२-२०२१). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) परिसरात भूखंड विकसित करण्यासाठी दिलेल्या सुमारे दीड कोटी रुपयांचा अपहार करुन फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चेंबूर पोलिसांनी एका व्यावसायिकांविरुद्ध अपहार आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०२-११-२०२१) :** (१) होय

(२) होय

(३) या प्रकरणी श्री.रणजित वर्दीचंद जैन यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चेंबूर पोलीस ठाण्यात गु.र.क्र.१२१/१९, कलम ४२०,४०६ भा.दं.वि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दिनांक २७.१०.२०२० रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्यांचे बांधकाम करण्याबाबत

**(१०) २७२२१ (१५-०६-२०२१). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ४० शाळांच्या १०१ वर्गखोल्या जीर्ण झालेल्या असून पूर्णतः मोडकळीस आल्या असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हा परिषद शाळांच्या जीर्ण वर्गखोल्यांचा सर्वे शासनाने केला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार जिल्हा परिषद शाळांच्या जीर्ण झालेल्या वर्गखोल्या पाडून नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर जिल्हा परिषदेच्या शाळा निर्लेखन करण्याबाबत दि. २ सप्टेंबर, २०२१ रोजी परवानगी देण्यात आली असून सदर शाळेतील वर्ग खोल्या दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील माथाडी कामगार मंडळांच्या बँक ऑफ बडोदा**
**बचत खात्यातून करोडो रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(११) २७६९४ (१५-०६-२०२१). श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रेल्वे गुड्स क्लीअरिंग ॲण्ड फॉरवडींग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई या माथाडी कामगार कल्याण मंडळाच्या मस्जिद बंदर येथील बँक ऑफ बडोदा मधील बचत खात्यातून दिनांक ७ जानेवारी ते १२ मार्च, २०२१ च्या दरम्यान बनावट धनादेशाद्वारे ५ कोटी ६ लाख इतकी रक्कम परस्पर काढून नेल्याचे दिनाक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी माथाडी कामगार मंडळाच्या प्रशासनाकडून माता रमाबाई आंबेडकर पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार करुन पायधुनी पोलीस ठाणे (मुंबई) येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन या गुन्ह्यातील संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०२-२०२२) :** (१), (२) व (३) रेल्वे गुड्स क्लिअरींग ॲन्ड फॉरवर्डीग एस्टॅब्लीशमेंट लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाच्या बँक ऑफ बरोडा, खांडबाजार, मस्जिद बंदर, मुंबई या बँक शाखेतील बोर्डाच्या खात्यातून दिनांक ०७/०१/२०२१ पासून ०२/०३/२०२१ या कालावधीत एकूण ८ धनादेशांवर बनावट स्वाक्षरी करुन धनादेशाद्वारे रुपये ५,०६,०५,०००/- इतक्या रक्कमेचा अपहार व फसवणूक केली आहे.

सदर प्रकरणी १) रशिद खान कन्स्ट्रक्शन, २) अरुणोदय शिक्षणसमिती, डोंगरगाव - भिलाई, ३) जयशक्ती कन्स्ट्रक्शन ४)कौशलेन्द्र देकाते, बालाघाट, ५) मे महर्षी इंटरप्रायजेस जनरल सप्लायर्स, बालाघाट या आरोपींविरुद्ध पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ९५/२०२१ कलम ४०६, ४०९, ४२०, ४२५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

या प्रकरणी तपास सुरु आहे. पाच लाभार्थींची खाती गोठविण्यात आली असून २० दुय्यम लाभार्थ्यांची खाती गोठविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत

**(१२) २८५२० (०९-०६-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात नैसर्गिक आपत्ती अंतर्गत खरीप हंगाम सन २०२० मध्ये प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत नुकसान भरपाईस पात्र असलेल्या शेतकऱ्यांचा तालुका, गावनिहाय, शेतकरी निहाय तपशील सॉफ्ट कॉपीमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, लातूर यांनी दिनांक २४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारासच्या पत्रान्वये विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषी विमा कंपनी लि.मुंबई यांना सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी आयुक्त यांच्या सूचनेनुसार नैसर्गिक आपत्तीत केलेले पंचनामे विचारात घेऊन प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांपैकी ज्या शेतकऱ्यांना स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या जोखमीच्या बाबी अंतर्गत नुकसान भरपाई अदा केलेली आहे असे शेतकरी वगळून सादर केलेल्या यादीतील इतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री पीकविमा योजनेतील खरीप हंगाम २०२० मधील अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत आयुक्त कृषी, कृषी आयुक्तालय, पुणे यांनी भारतीय कृषि विमा कंपनी लि.मुंबई सह सर्व विमा कंपनीस दिनांक ५ मार्च २०२१ रोजीच्या पत्रान्वये सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा कंपनीने तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,
(३) होय, हे खरे आहे,
(४) मा. मंत्री (कृषि), यांचे अध्यक्षतेखाली सर्व विमा कंपन्यांचे राज्य स्तरीय प्रमुखासोबत दि. ४ मार्च, २०२१ व ५ मे, २०२१ रोजी बैठक झाली असून सदर बैठकीमध्ये विमा कंपन्यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

खरीप हंगाम २०२० मध्ये लातूर जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंमलबजावणी भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत करण्यात आली. जिल्हयातील १०.४३ लाख शेतकऱ्यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्कम रु. ४९.८३ कोटी विमा हप्ता भरुन ५.९० लाख हे. क्षेत्र पिका करीता विमा संरक्षित केले आहे. योजनेतंर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १.२८ लाख शेतक-यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ७८.१५ कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबीअंतर्गत ९२५९ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. ८.६८ कोटी विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आले आहेत. तसेच विमा कंपनीकडून प्राप्त अंतरिम अहवालानुसार उत्पन्नावर आधारित ८१९७९ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रु. २१.६० कोटी निश्चित करुन कंपनीमार्फत वाटप करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत अनधिकृत पार्किग वसुली होत असल्याबाबत

**(१३) २८९५५ (११-०६-२०२१). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी घाटकोपर लिंक रोड वरील असल्फा भागातील लिंक रोड काहींसा रुंद असल्यामुळे या भागात असलेली गोदामे व कारखान्याचे टेंपो व ट्रक रात्रीच्यावेळी रस्त्याच्या दुतर्फा उभी केली जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहतूक पोलीस व इतर दलाल याचा गैर फायदा घेत असून त्यांचेकडून पार्किंग पोटी मासिक दोन हजार रूपये वसूल करत आहेत व न दिल्यास रात्री वाहने उचलून नेत असल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भागात रात्री ११ ते सकाळी ६ असे अधिकृत पार्किंग घोषित करून वाहन मालकांकडून मासिक ५०० ते १ हजार रुपयापर्यंत शुल्क वसुल केल्यास गैरप्रकारास आळा बसून शासनाच्या महसूलात वाढ होईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

या परिसरात गोदामे व कारखाने असल्याने कामगारांना कंपनीमध्ये ने आण करणाऱ्या बसेस, स्कुल बसेस व स्थानिक रहिवाशांची चारचाकी मोटार वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी करण्यात येत असतात.

(२) हे खरे नाही.

वाहतूक नियंत्रण शाखेकडून वाहतूकीस व पादचाऱ्यांस अडथळा होईल अशा रितीने अनधिकृतपणे पार्क करण्यात आलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये तसेच मोटार वाहन नियमांन्वये वेळोवेळी दंडात्मक कारवाई करण्यात येत असून कोणत्याही प्रकारची रक्कम अनधिकृतपणे वसुल करण्यात येत नाही.

तसेच अनधिकृतपणे पार्किंग केलेली अवजड/ मोठी वाहने/ बसेसवर कलम २८३ भा.द.वि.सं. अन्वये १३ गुन्हे स्थानिक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून, सदरप्रमाणे निरंतर कार्यवाही करण्यात येते.

(३) मुंबई वाहनतळ प्राधिकरणामार्फत 'एल' विभागांतर्गत येणाऱ्या विविध रस्त्यांच्या वाहतूक व्यवस्थापनाचे व पार्किंगचे सर्वेक्षण सुरू असून, सदर सर्वेक्षणाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे पश्चिम (मुंबई) येथील एका वृद्ध महिलेकडून सव्वा कोटीचे चरस जप्त केल्याबाबत**

**(१४) २८९६७ (१७-०६-२०२१). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे पश्चिम (मुंबई) येथील चिंचवड भागात एका वृद्धेच्या झोपडीवर छापा टाकून पोलिसांनी सव्वाकोटीचे चरस जप्त केले असून झोपडीतूनच एक वृद्ध महिला अनेक वर्षापासून ड्रग्ज रॅकेट चालवत असल्याचे दिनांक २४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुन्हे शाखा कक्ष -७ ने या प्रकरणी दोघांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, ४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०५-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय सदर प्रकरणी गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, कक्ष-७, घाटकोपर मुंबई यांनी तीन आरोपीतांना अटक केली आहे.

(३) दि. २२.०५.२०२१ रोजी गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, कक्ष-७, घाटकोपर मुंबई यांनी साने गुरुजी सेवा मंडळ, प्लॉट नं. १५७, वॉटर फिल्ड रोड, चिंचवडी, रोड नं २९, बांद्रा पश्चिम, मुंबई या ठिकाणी अंमली पदार्थ व्यवसाय चालविणा-या महिलेकडून व तिच्या साथीदाराकडून एकूण ३ किलो ९६० ग्रॅम वजनाचे अंदाजे रु.१,१८,८०,०००/- किमतीचे "चरस" हे अंमली पदार्थ ताब्यात घेतले आहे. सदर प्रकरणी तीन आरोपीतांना अटक करण्यात आली असुन प्रकरण तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्याबाबत**

**(१५) ३११०७ (१७-०६-२०२१). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सन २०२० च्या खरीप हंगामात सुमारे १७ लाख ९० हजार शेतकऱ्यांनी भारतीय कृषी विमा निगम कंपनीकडे पीक विमा काढला असुन त्यातील सुमारे ४ लाख ३२ हजार शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील केवळ २०,५३९ शेतकऱ्यांना सुमारे १३ कोटी ४६ लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी व महसूल विभागाने पिकांचे पंचनामे करून ४ लाख ३२ हजार शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे शासनाला व विमा कंपनीला कळविले असताना केवळ मोजक्या शेतकऱ्यांना मदत करून इतर शेतकऱ्यांना मदत न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या जिल्हयातील नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०८-२०२१) :** (१) हे अंशःत खरे आहे.

खरीप हंगाम २०२० मध्ये बीड जिल्हयातील १७.९० लाख शेतकऱ्यांनी योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रक्कम रु. ६०.६८ कोटी विमा हप्ता भरुन ६.२३ लाख हे. क्षेत्र पिका करीता विमा संरक्षित केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बीड जिल्हयातील पात्र २०,५३९ शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. १३.४७ कोटी जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, स्थानिक प्रशासनामार्फत माहे जुन २०२० ते ऑक्टोबर २०२० या कालावधीतील बीड जिल्हयातील ३३ टक्केवरील शेती पिके / फळ पिकांचे एकूण ६६६०७२ शेतकऱ्यांचे ३०६६०६ हे. नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करण्यात आले आहेत. त्यानुषंगाने स्थानिक प्रशासनाने NDRF अंतर्गत नुकसान भरपाई अदा करणेसाठी केलेल्या पंचनामांच्या याद्या संबंधित विमा कंपनीस सादर केल्या आहेत.

(४) दि. ०४.०३.२०२१ रोजी मा. मंत्री (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावाबैठकी मध्ये प्राप्त सूचनांनुसार खरीप हंगाम २०२० प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांपैकी बरेच शेतकरी स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणी पश्चात नुकसान भरपाई या जोखमीच्या बाबी अंतर्गत योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नुकसान भरपाई पासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आल्याने, खरीप हंगाम २०२० मधील आलेल्या नैसर्गिक आपत्ती (NDRF) अंतर्गत महसूल, कृषि व जिल्हा परिषद या विभागामार्फत ३३ % पेक्षा जास्त नुकसान झालेले क्षेत्राचे केलेले पंचनामे विचारात घेवून त्यापैकी ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत सहभाग घेतला आहे व ज्या शेतकऱ्यांना पिक विमा योजने अंतर्गत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही अशा पात्र शेतकऱ्यांना स्थानिक प्रशासनाने केलेले पंचनामे आधारभूत

मानून विशेष बाब म्हणून प्रधानमंत्री पिक विमा योजने अंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्र. ८८३७ दि. ०५.०३.२०२१, १३४६९ दि. ०८.०४.२०२१ व १५२०४ दि. ०६.०५.२०२१ च्या अन्वये भारतीय कृषि विमा कंपनीस कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बंदावस्थेत असलेले कसाल पोलीस दूरक्षेत्र पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(१६) ३२२२० (०४-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कसाल पोलीस दूरक्षेत्र सद्य:स्थितीत बंदावस्थेत असल्याचे दिनांक २१ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील बंदावस्थेत असलेले कसाल पोलीस दूरक्षेत्र पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०२-२०२२) :** (१), (२) व (३) कोविड-१९ बंदोबस्त, कसाल दूरक्षेत्र भागात कन्टेंन्टमेन्ट झोन, नाकाबंदी फिक्स पॉईन्ट पेट्रोलिंग, लॉकडाऊन बंदोबस्त व इतर बंदोबस्त इ. कामकाजामुळे कसाल पोलीस दुरक्षेत्र येथे पोलीस अंमलदार नेमणे शक्य होत नव्हते. परंतु, सदयस्थितीत कसाल पोलीस दूरक्षेत्र पुर्ववत सुरू असून, तेथे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी २ पोलीस अंमलदार यांची नेमणूक केली असून, दूरक्षेत्रातील कामकाज सुरळीत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटल मध्ये शासकीय नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(१७) ३२३२९ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटल मध्ये लिव्हर ट्रान्सफर, किडनी ट्रान्सफर, कर्करोग अशा आजाराच्या रुग्णांवर उपचार केले जात असून तेथे कोविड व नॉन कोविड रुग्णांवर देखिल उपचार केले जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालय प्रशासनाकडून दाखल झालेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून जादा वैद्यकीय बिले आकारणे तसेच काही मृत रुग्णांच्या नातेवाइकांना वाढीव बिले अदा केल्याशिवाय मृतदेह ताब्यात न देणे तसेच कोविड -१९ रुग्णांकरिता शासनाकडे ताब्यात देण्यात आलेल्या खाटांमध्येही गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आले असून उच्चभ्रू व्यक्तीच्या नावाने खाटा राखीव ठेवून सामान्य रुग्णांना खाटा उपल्ध करुन देण्यास टाळाटाळ केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील हॉस्पिटल मध्ये इतर आजारांसाठी व कोविड -१९ रुग्णांसाठी शासनाची अधिसुचना कोरोना २०२० सी.आर. ९७/आरो-५, सार्वजनिक आरोग्य विभाग, नवी मंत्रालय, मुंबई.दि.२१ मे, २०२० ची (Annexure-A आणि Annexure C निर्णयानुसार बिल आकारण्यात येण्यासंबंधी आदेश देण्यात आले असतानाही शासन आदेशाकडे दुर्लक्ष करून सदर रुगणालय प्रशासनाकडून रुग्णांची आर्थिक लुट केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदर हॉस्पिटल मध्ये शासनाच्या अवयव प्रत्यारोपण विभागा अंतर्गत ZTCC (Zonal Transplant Coordination Centre) या समितीच्या अंतर्गत किडनी ट्रान्सप्लांट, लिव्हर ट्रान्सप्लांट या रुग्णांच्या शस्त्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार शासनाने ठरवून दिलेले दर आकरण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर रुग्णालयात शासनाच्या आदेशाची नियमाप्रमाणे अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत असल्याने अवयव प्रत्यारोपण विभागाच्या कामकाजाचे सविस्तर चौकशी करण्याबाबत तसेच हॉस्पिटल मधील कोविड -१९ या संसर्गाच्या कालावधीपासून म्हणजे माहे मार्च २०२० ते एप्रिल २०२१ पर्यंतचे रुग्णांकडून आकारण्यात आलेल्या (कोविड -१९ व नॉन कोविड) बिलांचे तातडीने लेखापरिक्षण करून शासनाच्या नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी चिंचवड यांनी दिनांक ८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२२-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे,

शासन अधिसुचना दि. २१ मे २०२० नुसारच कोविड रुग्णांना बील आकारणी करण्यात यावी या बाबत सर्व खाजगी रुग्णालयांना यापुर्वीच सुचना देण्यात आलेल्या आहेत. शासन अधिसुचनेपेक्षा जादा बील आकारणी केलेल्या बीलांच्या तक्रार निवारणासाठी पुणे महानगरपालिकेकडून शहरातीत मोठ्या रुग्णालयात ऑडिटर्सची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार अशा तक्रारी ऑडिटर्स यांना प्राप्त होताच. संबंधीत ऑडिटर्स यांनी बिलांची तपासणी करून जादा बील आकारणी झाल्याचे निदर्शनास आल्यास अशी रक्कम वेळोवेळी कमी करून देणेबाबत रुग्णालय प्रशासनास कळवून त्यानुसार जादा रक्कम संबंधीत रुग्णांस अथवा त्यांचे नातेवाईकास परत करणेबाबत वेळोवेळी कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मृतदेह ताब्यात न देणेबाबत यापूर्वी तोंडी तक्रारी प्राप्त झाल्या असता त्यावर तातडीने वेळोवेळी दूरध्वनीद्वारे शहरातील सर्व खाजगी रुग्णालय प्रशासनास संपर्क करून ताबडतोब मृतदेह रुग्णाच्या नातेवाईकांच्या ताब्यात देणेबाबत कळविले असता, त्यानुसार रुग्णालय प्रशासनाने कार्यवाही करुन मृतदेह संबंधीत नातेवाईकांच्या ताब्यात दिला आहे.

कोवीड-१९ रुग्णांसाठी उपलब्ध खाटांचे सुयोग्य रित्या नियोजन करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालय स्तरावरून संगणकीय डॅशबोर्ड तयार करणेत आलेला आहे. त्यावरून उपलब्ध खाटांची माहिती आरोग्य विभागास तसेच सामान्य नागरीकांना वेळोवेळी उपलब्ध येत आहे. तसेच कोवीड-१९ गरजू रुग्णांसाठी आवश्यकते प्रमाणे खाटा लवकरात लवकर उपलब्ध होण्याचे दृष्टीने पुणे महानगरपालिका स्तरावर वॉर रुम (नियंत्रक कक्ष) निर्माण करण्यात आलेला आहे. त्याव्दारे गरजू रुग्ण व त्यांचे वतीने त्यांचे नातेवाईक यांना वेळोवेळी नियंत्रण कक्षामार्फत खाटा उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. तसेच उच्चभ्रू व्यक्तीच्या नावे राखीव खाटा ठेवलेबाबत गैरप्रकाराची घटना निर्दशनास आलेली नाही.

(३) अंशत: खरे आहे.

बील आकारणीबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्व खाजगी रुग्णालयांना कळविणेत आलेले आहे. ज्युपीटर हॉस्पीटल बाबत दि. १४/०८/२०२० पासून आजअखेर एकूण १०३ तक्रारी प्राप्त झाल्या. सदरच्या तक्रारी (प्री ऑडिट) हया रुग्ण ज्युपीटर हॉस्पीटल येथून डिस्चार्ज होत असतांना हॉस्पीटलमधील ऑडिटर्स यांचेकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ०९ बीलांची रक्कम कमी करणे आवश्यक ठरलेले आहे.

सदर प्री ऑडिटच्या १०३ बीलांची एकूण रु.६९,४९,४२७/ - इतकी होती, बीले दुरुस्त होऊन अंतीमतः रुग्णांनी भरावयाची रक्कम रु.५९,५४,१९५/- झाली. तसेच तडजोडीनंतर रु. ९,९५ २३२/- इतकी संबंधीत रुग्णांना परत करणेबाबत रुग्णालय प्रशासनाने बीलांतच दुरुस्ती करुन कमी रकमेची बीले संबंधी रुग्णांना दिली आहेत. तसेच आरोग्य विभागाकडे आजअखेर लेखी स्वरुपात एकूण ०३ तक्रारी (पोस्ट ऑडिट) प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी ०१ बीलाबाबत हॉस्पीटल प्रशासनाला नोटीस पाठविण्यात आलेली आहे. व अपुर्ण माहितीमुळे ०२ तक्रारी कार्यवाही स्तरावर प्रलंबीत आहे. तसेच एका बीलात संबंधीत रुग्णास रु.२४,३६०/- इतका हॉस्पीटल प्रशासनाकडून परतावा मिळालेला आहे. तसेच आजअखेर ऑडिटर्स यांचेकडून नियमितपणे बीलांबाबत तपासणी करुन बीलाची जादा आकारणी झाल्याचे निदर्शनास आल्यास बील कमी करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसंबंधी कोणतेही दर शासनाने ठरवून दिलेले नाहीत.

(५) हे अशंत: खरे आहे.

हॉस्पीटल मधील कोविड-१९ या संसर्गाच्या कालावधीपासून म्हणजे माहे मार्च-२०२० ते एप्रिल २०२१ पर्यंतचे रुग्णांकडून आकारण्यात आलेल्या (कोविड- १९ व नॉन कोविड) बीलाचे तातडीने ऑडिट करून शासनाच्या नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याबाबत मा. लक्ष्मण पांडुरंग जगताप,वि.स.स. चिंचवड यांचे दिनांक ८ मे, २०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यानुसार क्षेत्रिय वैद्यकीय अधिकारी, पुणे मनपा यांनी कोविड बाधित रुग्णांची काही बीले तपासली असता सदर बिले शासनाने ठरवून दिलेल्या दरपत्रकानुसार योग्य असल्याबाबत आढळून आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील नांदरूख - गिरोबा मंदिर मार्गे - आनंदव्हाळ या रस्त्याची देखभाल -दुरुस्ती अभावी झालेली दुरवस्था

**(१८) ३२३९४ (१२-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील नांदरूख - गिरोबा मंदिर मार्गे - आनंदव्हाळ या पंतप्रधान सडक योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्याची सद्यस्थितीत देखभाल - दुरुस्ती अभावी मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झालेली असल्याने स्थानिक ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याचे माहे दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या पट्ट्यादेखील खराब झाल्याने वाहनांना अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यावर गिरोबा मंदिरानजीक घालण्यात आलेल्या मोरीची जागा चुकलेली असल्याने या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर साठत असल्याने निर्माण झालेल्या चिखलाच्या साम्राज्यात अनेक दुचाकीस्वार घसरून अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू रस्त्याच्या दुरुस्तीचे आणि आवश्यक सुधारणांचे काम तातडीने हाती घेण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-०२-२०२२) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्यावर गिरोबा मंदिरानजीक खड्डा पडला असल्याने पाणी साचत आहे हे खरे आहे.

(४) सदर रस्त्याचे काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत पूर्ण होऊन १० वर्षे झाली आहेत. त्यामुळे शासन धोरणानुसार सदर रस्ता पुढील देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करणेची कार्यवाही सूरु आहे. हस्तांतरणानंतर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधीतून तसेच जिल्हा वार्षिक योजनेमधून प्रश्नांकित रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम प्रस्तावित करणेबाबत जिल्हा परिषदेला सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत मर्डे (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) यांच्या कार्यक्षेत्रातील डोंगरउतारावर वसलेल्या खाजणवाडी येथे तातडीने संरक्षण भिंत बांधण्याबाबत

**(१९) ३२३९५ (१२-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत मर्डे (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) यांच्या कार्यक्षेत्रातील डोंगरउतारावर वसलेल्या खाजणवाडी येथे डोंगर खचून नुकत्याच घडलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील तळये येथील दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी संरक्षण भिंत बांधून देण्याबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी सातत्याने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणाची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीत काय आढळून आले आहे आणि भविष्यात या ठिकाणी डोंगर खचून दुर्घटना घडून होणारी जीवित आणि मालमत्ता हानी टाळण्यासाठी तातडीने संरक्षण भिंत उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०२-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) सदर ठिकाणी गट विकास अधिकारी पं.स.मालवण यांनी स्वत: दिनांक ०७/१२/२०२१ रोजी पाहाणी केली असून संबंधित सरपंच, उपसरपंच, ग्राम विकास अधिकारी हे उपस्थित होते. पाहणीमध्ये पावसाळयामध्ये डोंगर उताराचे पाणी मातीसह मोठया प्रमाणात वाहून येते व ती माती येऊन लोकांच्या घरासमोर किंवा वाटेत जमा होते असे आढळून आले आहे. सदरची वाडी ही डोंगर उतारावर वसलेली असल्याने भविष्यात त्या ठिकाणी भूस्खलन होण्याचा धोका आहे. ग्रामपंचायतीला संरक्षण भिंत मागणी करणेबाबत समक्ष सूचना केलेल्या आहेत. गट विकास अधिकारी पं.स.मालवण कार्यालयाकडील जा. क्र २८४२/२१ दि.२३/१२/२०२१ चे पत्रान्वये उपअभियंता, बांधकाम उपविभाग मालवण, ता.मालवण यांना सदर प्रकरणाबाबत पाहणी करून आवश्यक उपाययोजना करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणेसंबंधी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामपंचायत कार्यालय तऱ्हाळा (ता. मंगरूळपिर जि. वाशिम) येथे प्रशासकांच्या झालेल्या निवडीबाबत

**(२०) ३२४२० (२५-११-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत कार्यालय तऱ्हाळा, (ता. मंगरूळपिर, जि. वाशिम) येथे प्रशासक म्हणून देवा राठोड ग्रामसेवक यांची निवड झाली तेव्हापासून ग्रामपंचायत कार्यालयामध्ये विकास कामाचा गैरप्रकार होत असून सदर कामाची माहिती प्राप्त होण्याकरीता दिनांक १/६/२०२१ रोजीच्या माहिती अधिकार अर्जान्वये पंचायत समिती मंगरूळपीर गटविकास अधिकारी यांना मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अद्यापही माहिती न मिळाल्याने दिनांक २ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास अपील अर्ज पंचायत समितीकडे दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, ग्रामपंचायतीने अद्यापही माहिती न दिल्याने सदर नियमाचा भंग झाला असून या प्रकरणी संबंधित दोषी ग्रामसेवक देवा राठोड यांचेवर विशेष चौकशी समिती स्थापन केली असून संबंधीत ग्रामसेवकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

श्री. विशाल रामहरी जागृत रा. तऱ्हाळा यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर यांच्याकडे माहिती अधिकार अर्ज केला होता.

(२) होय.

श्री. विशाल रामहरी जागृत रा. तऱ्हाळा यांनी दि. २/८/२०२१ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मंगरुळपीर यांच्याकडे अपिल अर्ज केला आहे. सदर अपील अर्जाच्या अनुषंगाने प्रथम सुनावणी दिनांक १७.०९.२०२१ रोजी,द्वितीय सुनावणी दि. ३०.९.२०२१ रोजी व तृतीय सुनावणी दि. १०.१२.२०२१ रोजी ठेवण्यात आली होती. सदर तीनही सुनावणीकरीता अपिलार्थी गैरहजर होते. सदरचा अपिल अर्ज अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तऱ्हाळा यांनी अपीलार्थीस ७ दिवसाच्या आत आवश्यक असलेली माहिती निशुल्क द्यावी. तसेच या कालावधीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्यास अपिलार्थीने अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे असे आदेश पारित करुन सदरचा अपिल अर्ज अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी निकाली काढला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ. त-हाळा व पिंप्री (अवगण) ता. मंगरूळपीर, जि. वाशिम येथील ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या कामांमधील गैरकारभाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२१) ३२४२८ (२५-११-२०२१). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त-हाळा व पिंप्री (अवगण) ता.मंगरूळपीर, जि. वाशिम येथील उपरोक्त विषयाबाबत मंत्री (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाकडून ग्रामविकास विभागास प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने श्री. दिलीप महादेवराव अवगण, रा. पिंप्री (अवगण), पो.सोयता ता.मंगरूळपीर, जि. वाशिम यांच्या दि. ८.१.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जांच्या मूळप्रती सहपत्रासह मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांना संकीर्ण पत्र क्रमांक २०२१/प्र.क्र.४१/वित्त-४ बांधकाम भवन यांनी दिनांक ५ मे, २०२१ रोजी पत्र पाठवले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणात दोषी असणाऱ्या ग्रामसेवक तऱ्हाळा व पिंप्री (अवगण), पो.सोयता व शाखा अभियंता खोडवे यांनी १४ वर्षात पंचायत समिती मध्ये कार्यरत असताना केलेल्या कामाची शासनाने गुण नियंत्रण व दक्षता पथकाकडून या सर्व कामाची तपासणी केली आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसेवक तऱ्हाळा व पिंप्री (अवगण), पो.सोयता व शाखा अभियंता खोडवे यांनी उक्त ग्रामपंचायतींना शासनाकडून प्राप्त झालेल्या १४ वित्त आयोगाच्या प्राप्त निधींचा केलेल्या अपहार प्रकरणी शासनाकडून पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदवला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाकडून चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करुन झालेल्या गैरव्यवहाराची रक्कम शासनाकडे जमा करण्याबाबत तसेच उक्त दोषींवर निलंबन करण्याबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (११-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत त-हाळा व पिंप्री, ता.मंगरूळपीर ग्रामसेवक व शाखा अभियंता श्री.खोडवे यांनी गेल्या १४ वर्षात पं.स.मंगरूळपीर येथे कार्यरत असताना केलेल्या कामाची गुणनियंत्रक व दक्षता पथक कडून तपासणी करून घेण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) नाही, ग्रामसेवक त-हाळा व पिंप्री अवगण तसेच शाखा अभियंता श्री.खोडवे यांनी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून केलेल्या कामाची तपासणी करण्याची कार्यवाही सुरू आहे.त्यामुळे गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.
(४) तपासणीची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**दुध दरासंदर्भात शासनाने उसाच्या धर्तीवर हमीभाव कायदा करण्याबाबत..**

**(२२) ३२६७७ (०७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नसल्यामुळे दुधाला दर वाढवून मिळण्यासाठी किसान सभा, दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती, रयत क्रांती शेतकरी संघटना आदि दूध उत्पादक शेतकरी संघटनांनी माहे मे-जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलने केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूध दरवाढीसंदर्भात दिनांक २५ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा. दुग्धविकास मंत्री यांचे अध्यक्षतेखाली विविध दुध उत्पादक शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी यांच्या समवेत मंत्रालय, मुंबई येथे बैठक झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीत उसाच्या धर्तीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांना योग्य व किफायतशीर दर (एफआरपी) देण्याच्या दृष्टीने शासकीय पातळीवर अभ्यास करुन निर्णय घेण्यांत येईल तसेच दूध उत्पादक शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींनी दुधाला योग्य दर मिळण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने परस्पर समन्वयातून शासनाने दुधाचा हमीभाव कायदा अंमलात आणण्याची मागणी केली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बैठकीत ठरल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (११-०२-२०२२) :** (१) राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूधाचा रास्तभाव देण्याबाबत विविध संघटना तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) किमान आधारभूत किंमत (एफआरपी) लागू करण्याबाबत व्यवहार्यता तपासण्यासाठी मंत्रीमंडळाची उपसमिती स्थापन करण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालखेड ते थोपटेवाडी (ता.हवेली, जि.पुणे) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२३) ३२७०४ (०६-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालखेड ते थोपटेवाडी (ता.हवेली, जि.पुणे,) येथील रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या निधीतून मंजूर झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम करताना निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (संशोधन व विकास) अंतर्गत पुणे जिल्ह्यातील मालखेड ते खाटपेवस्ती थोपटेवस्ती रस्ता, ता.हवेली या रस्त्याचे काम पुर्ण झालेले असून सदर रस्त्यावर विविध स्तरावर राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्याकडून तपासणी झाली असून तपासणीअंती समाधानकारक शेरे प्राप्त आहेत. तसेच बांधकामासाठी लागणारे साहित्य जिल्हा प्रयोगशाळेमधून तपासुन घेण्यात आले आहे. सदर रस्ता ग्रामीण मार्ग असल्याने १० टन वाहतूक क्षमतेसाठीच डिझाईन केला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नांदेड सिटी ते पाबे या रस्त्याचे काम हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत करण्यात येत असून या रस्त्याच्या कामासाठी लागणारे सर्व बांधकाम साहित्य, मशीनरी व अवजड वाहनांची वाहतूक मालखेड ते खाटपेवस्ती थोपटेवस्ती या रस्त्यावरून केली जाते. सदर रस्ता हा हलक्या वाहतुकीसाठी बांधण्यात आला असून जड वाहतूक होण्याअगोदर सदरील रस्ता सुस्थितीत होता व तद्नंतर खराब झाला असून

सार्वजनिक बांधकाम विभागाने हायब्रीड ॲन्युईटी मॉडेलच्या ठेकेदारास पत्र देऊन सदर रस्ता सुस्थितीत करून देण्याबाबत कळविलेले असून या संदर्भात पाठपुरावा सुरू आहे.

---

**नांदेड जिल्हयात महा-डीबीटी अंतर्गत अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

**(२४) ३२९४५ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील महा-डीबीटी पोर्टलवर कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ एकाच अर्जाद्वारे मिळण्यासाठी माहितीसह अर्ज दाखल करण्याची अंतीम मुदत दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास संपली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही दिवसांपासून सर्व्हेर डाऊन असल्यामुळे अनेक शेतक-यांना अर्ज दाखल करण्यात आले नसल्याने अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज दाखल करण्यास मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१६-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

महाडीबीटी प्रणालीवर अर्ज करण्याची प्रक्रिया निरंतर सुरु असते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सन २०२०-२०२१ मध्ये जलसंधारण विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या लघु पाटबंधाऱ्यांचे प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) ३३२५९ (०५-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२०-२०२१ मध्ये जलसंधारण विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या लघु पाटबंधाऱ्यांचे प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी नंतरही मा.मृद व जलसंधारण मंत्र्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंधारण विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या लघु पाटबंधाऱ्यांचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रकरणी चौकशीच्या अनुषंगाने मंजूर करण्यात आलेल्या लघु पाटबंधाऱ्यांचे प्रस्ताव त्वरीत होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१४-०२-२०२२) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मा.विधानसभा सदस्य यांच्या दिनांक १५/१२/२०२० रोजीच्या पत्रातील दापोली विधानसभा मतदार संघातील प्रस्तावित १३ लघु पाटबंणारे योजनांपैकी ५ योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त आहे.सदर ५ योजनांपैकी एका योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून योजनेस कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. उर्वरित ४ योजनांची अंदाजपत्रके मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. परंतू सद्यस्थितीत राज्यामध्ये गौण खनिजाचे सुधारीत दर लागू झाल्याने सन २०२०-२१ ची दरसुचीनुसार अंदाजपत्रके अद्ययावत करून फेरसादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर पत्रात नमूद १३ योजनांपैकी ८ योजनांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांच्याकडून प्राप्त होताच प्रशासकीय मान्यता देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(४) पाणी उपलब्धता प्रमाणपत्र अप्राप्त असलेल्या ८ योजनांचे प्रस्ताव मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गेवराई विधानसभा मतदार संघातील लघूपाटबंधारे विभागाच्या पाझर तलावांच्या सांडव्या लगतच्या अतिक्रमणामुळे तलावांना निर्माण झालेल्या धोक्याबाबत**

**(२६) ३३३४३ (०५-०१-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जिल्हा बीड) विधानसभा मतदार संघातील लघूपाटबंधारे विभागाच्या पाझर तलावांच्या सांडव्या लगतच अतिक्रमण करुन लागवड केली असल्याचे व लागवड केलेल्या पिकाला पाणी लागू नये म्हणून सांडवा फोडणे, दुस-या बाजूने पाणी काढून देणे असे प्रकार अतिवृष्टीमुळे फुटलेल्या पाझर तलावांची व धोकासदृश्य स्थितीतील तलावांची पाहणी करीत असताना निदशर्नास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त एका व्यक्तीच्या कृत्यामुळे तलावांचा सांडवा खिळखिळा होऊन तलावांना धोका निर्माण होत असून देखील लघू पाटबंधारे विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे निदशर्नास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तलावांच्या सांडव्यालगत अतिक्रमण करुन लागवड केली जाणार नाही, ज्यामुळे तलावांचा सांडवा व तलाव सुरक्षित राहिल यासाठी शासनाने काय उपाय योजना केली आहे व तलावात अतिक्रमण करुन होत असलेली लागवड व ज्यामुळे तलावांना निर्माण झालेला धोका याकडे राजरोसपणे दुर्लक्षीत करणाऱ्या लघू पाटबंधारे विभागाच्या अधिकार्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१४-०२-२०२२) :** (१) व २) हे खरे नाही.
(३) जलसंधारण अंतर्गत असलेल्या कामांची विभागामार्फत (जलसंधारण व जिल्हा परिषद) वारंवार पाहणी करून सांडव्यामध्ये अतिक्रमण होणार नाही याची वेळोवेळी दक्षता घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आशा स्वंयसेविकां व गटप्रवर्तक यांच्या विविध मागण्यासंदर्भात .**

**(२७) ३३४१३ (१०-०१-२०२२). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर), डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आरोग्य विषयक सर्व योजना, मोहिमा या गाव पातळीवर वाड्या व वस्त्यांपर्यंत जाण्याचे काम आशा सेविका व गटप्रवर्तक यांच्या मार्फत करण्यात येत असून एकूण ७३ प्रकारचे नियमित कार्य या करीत असून कोरोना काळामध्ये सर्वेक्षण, लसीकरण व त्या संबंधित घरोघरी जावून माहिती संकलित करून आरोग्य विभागास देणे, ऑनलाईन डाटा तयार करणे इत्यादी कामे त्यांनी यशस्वीरीत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियान (National Health Mission- एनएचएम ) अंतर्गत राज्यात सुमारे ६९ हजार आशा स्वंयसेविका कार्यरत असून माहे एप्रिल ते सप्टेंबर,२०२१ या ६ महिन्यांचे मानधन त्यांना मिळाले नसल्याचे दि.०१ ऑक्टोबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून मानधनाअभावी आशा स्वंयसेविकांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे थकीत मानधनाची रक्कम तातडीने देण्यांत यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशा स्वंयसेविका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य संचालक,मुंबई यांचेकडे गेल्या २ महिन्यापासून करण्यांत आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील आशा वर्कर व गट प्रवर्तक महिला यांनी कोरोना काळात केलेल्या कामाचा मोबदला अद्याप मिळाला नसल्यामुळे त्यांनी या संदर्भात तहसीलदार, दर्यापूर मार्फत मा. मुख्यमंत्री यांना माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे तसेच सोलापूर शहर व ग्रामीण भागात आशा स्वयंसेविका फ्रटलाईन वर्कर म्हणून सक्रिय असून प्रत्येक कुटुंबातील सदस्यांची नियमित आरोग्य

तपासणी करणे, माहिती नोंदविणे इत्यादी कामे करित असून यातील काही अशा स्वयंसेविका कोरोना बाधित झाल्या तर काहींचा याच काळात मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले असून माझे कुटुंब माझी जबाबदारी या अभियानात सक्रिय कामगारांना प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव मांडला गेला होता परंतु त्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने गेल्या सहा महिन्यांपासून कामगारांना मानधन मिळाले नसल्याचे वृत्त दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी व त्या सुमारास प्रसिद्ध झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना काळात कोविड रुग्णसेवा केल्यामुळे दिला जात असणारा कोविड-१९ प्रोत्साहन भत्ता १ सप्टेंबर, २०२१ पासुन शासनाने बंद केला तो पूर्ववत सुरु करावा, आशा सेविका व गटप्रवर्तक यांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा, आशा सेविकांना किमान वेतन १८ हजार तर गट प्रवर्तकांना २१ हजार द्यावे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर दरवर्षी ५ टक्के मानधनात वाढ मिळावी, आरोग्य कर्मचाऱ्यांप्रमाणे दररोज ३०० रुपये प्रोत्साहन भत्ता मिळावा, आरोग्यसेविका पद भरतीमध्ये आशा सेविका व गटप्रवर्तकांना ५० टक्के आरक्षण मिळावे या व अशा विविध मागण्यांसाठी देशव्यापी संपाची हाक दिली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आशा वर्कस व गटप्रवतक यांच्या विविध मागण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना केंद्र शासन व राज्य शासना मार्फत त्यांनी केलेल्या कामाच्या आधारीत मोबदला अदा करण्यात येतो. त्यांना माहे सप्टेंबर, २०२१ अखेर पर्यंत रु. ३००.०० कोटी इतका मोबदला अदा करणे अपेक्षित होते. परंतू प्रत्यक्षात रु. २६१.६३ कोटी इतका मोबदला अदा करण्यात आला आहे. उर्वरित मोबदला विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे मंजूर झालेल्या निधीमधून अदा करण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने माहे सप्टेंबर, २०२१ पर्यंत आशा व गटप्रवर्तकांना कोविडचा मोबदला अदा करण्याकरीता मान्यता दिलेली होती. सदर मान्यतेच्या अधीन राहून माहे एप्रिल, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ पर्यंत दर्यापूर तालुक्यातील आशा व गटप्रवर्तकांना रु. १०.१३ लक्ष इतका मोबदला अदा करण्यात आलेला आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ च्या सर्वसाधारण सभेमध्ये जिल्हा परिषदेच्या निधीतून ग्रामीण भागातील आशांना रु. २०००/- प्रमाणे प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रु. ५५.५२ लक्ष इतका मोबदला आशांना अदा करण्यात आलेला आहे. सोलापूर महानगरपालिकेने कोविडच्या कामकाजाकरीता त्यांच्या निधीतून दरमहा रु. ४०००/- प्रमाणे माहे मार्च, २०२१ व माहे एप्रिल, २०२१ या कालावधीचा एकूण रु. १७,२४,९६८/- इतका प्रोत्साहनात्मक कोविड भत्ता अदा करण्यात आला असून माहे मे, २०२१ चा कोविड भत्ता अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच कोविडचा प्रादुर्भाव कमी झाल्याने माहे जून, २०२१ पासून सदर मोबदला बंद करण्यात आला आहे.

(४) हे खरे आहे.
(५) आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना केंद्र सरकार कडून कामावर आधारीत मोबदला देण्यात येतो. राज्य शासनामार्फत दिनांक १७.०७.२०२० च्या शासन निर्णयानुसार जुलै, २०२० पासून त्यांना प्रत्येकी रु. २०००/- व रु. ३०००/- इतका मोबदला अदा करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०९.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना जुलै, २०२१ पासून रु. १०००/- व रु. १२००/- व कोविड भत्ता रु. ५००/- रु. इतका अदा करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खतांच्या दरात मोठया प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२८) ३३४७५ (०६-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने खतांच्या किंमतीत दिडपट वाढ केल्यामुळे तसेच राज्यात वेगवेगळया खतांच्या दरात मोठया प्रमाणात झालेल्या वाढीमुळे त्याचप्रमाणे करोना, ओला दुष्काळ व वादळामुळे शेतक-यांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांमध्ये खतांच्या दरांमध्ये वाढ झाली असल्यामुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील दरवाढ केंद्र सरकारने मागे घेण्यासह राज्यातील खतांच्या दरात सूट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) खतांच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने बुलढाणा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(३) खतांवरील अनुदान केंद्रीय खत विभागामार्फत देण्यात येते. त्यानुषंगाने, मा. मंत्री (कृषि) यांचे स्तरावर केंद्रीय खते मंत्री यांना दि. ०९/०४/२०२१, दि. १८/०५/२०२१ आणि दि. १२/१०/२०२१ च्या पत्रान्वये खताचे दर कमी करण्याबाबत विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार, केंद्रीय खत विभागाने दि. २० मे २०२१ व दि. १३/१०/२०२१ च्या आदेशान्वये सन २०२१-२२ च्या खरीप व रब्बी हंगामासाठी खतांवरील अनुदानाच्या दरामध्ये वाढ केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं.२५०/४/ब मिळकतीमध्ये तत्कालीन उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी केलेला गैरप्रकार**

**(२९) ३३५३५ (०६-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बदलापूर (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. २५०/४/ब मिळकतीबाबत न्यायालयात रिट पिटीशन याचिका क्र.५४९८/२०२० अन्वये दाखल असताना सौ.विना मिलिंद जोशी यांना विश्वासात न घेता दत्तात्रय कृष्णा लवाटे यांना मुंबई-वडोदरा रस्त्याच्या भूसंपादनाची रक्कम दिल्याचे दाखवून दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी सदर रक्कमेतील सुमारे ६,३८,८५,०४८ इतकी रक्कम इंडसईंड बँक लि., उल्हासनगर शाखा यांना लेखी पत्र देवून तीन एजंटमार्फत स्वत: पैसे काढून घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-०२-२०२२) :** (१) हे, खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळू नदी प्रकल्पास स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असल्याबाबत**

**(३०) ३३५३९ (०५-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील काळू नदी धरण प्रकल्पास स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने काळू नदी धरण प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२२-०२-२०२२) :** (१) होय.

(२) प्रकल्प बाधितांच्या संमतीने त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी भूसंपादन व पुनर्वसन कायद्यानुसार कार्यवाही करणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हा परिषदेतील राष्ट्रीय ग्रामीण नागरी आरोग्य अभियानाच्या जिल्हा लेखा व्यवस्थापक यांच्या गैरकारभाराबाबत**

**(३१) ३३७४९ (१०-०१-२०२२). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषद, येथील आरोग्य विभागातील राष्ट्रीय ग्रामीण नागरिक आरोग्य अभियाना अंतर्गत (N.R.H.M.) लेखा व्यवस्थापक या पदावर कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या श्रीमती वैशाली थोरात यांचा मनमानी कारभार , वरिष्ठांची दिशाभूल करणे, कर्मचाऱ्यांना त्रास (हॅरसमेंट) देणे इत्यादी कारणामूळे तत्कालीन आरोग्य राज्यमंत्री यांनी त्यांची सेवा समाप्त केली होती , हे खरे आहे काय,

(२) तसेच, त्याच्याकडुन करण्यात येणाऱ्या मनमानी कारभारा विरोधात अनेक कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार, अधिकारी यांनी केलेल्या तक्रारींवर जिल्हास्तरावरून कोणती कारवाई करण्यात आली आहे ,

(३) तसेच, त्यांची दोन राज्यस्तरीय चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, सदर चौकशी समितीच्या प्राप्त अहवालानुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे काय,

(४) तसेस, त्याच्या विरोधात माहे फेब्रुवारी, २०१९ च्या अर्थसंकल्प अधिवेशनात त्यांना पुनर्नियुक्ती न देण्याबाबतचा ठराव केलेला असताना त्यांना परत सेवेत घेतले आहे काय,

(५) असल्यास, सद्यास्थित त्यांना सेवेत पुर्नस्थापित करण्यात आली आहे काय, असल्यास, शासनाच्या कोणत्या आदेशान्वये त्यांना पुर्नस्थापित करण्यात आली आहे,

(६) असल्यास, त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते परंतु मंत्रालय आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करून ज्या जिल्हयात त्यांची सेवा समाप्त करण्यात आली होती त्या जिल्हयातच आणि त्याच पदावर वैशाली थोरात यांची नेमणूक केली असल्याचे निदर्शनास आले असून अश्याप्रकारे नेमणूक करता येते काय?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) सोलापूर जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी जिल्हा लेखा व्यवस्थापक या पदावर श्रीमती वैशाली थोरात या दिनांक ०५.०२.२०१० पासून कार्यरत होत्या.

सन २०१९ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात पुरवणी मागण्यावरील चर्चेदरम्यान त्यांच्यावरील तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांनी श्रीमती वैशाली थोरात यांच्या कंत्राटी नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर फेरनियुक्ती देण्यात येणार नाही असे आश्वासन दिले होते. त्यास अनुसरुन श्रीमती थोरात यांना पुर्ननियुक्ती देण्यात आलेली नाही. तसेच श्रीमती थोरात यांच्यावरील तक्रारी संदर्भात एक परिमंडळ स्तरावर व एक राज्यस्तरावर चौकशी करण्यात आलेली आहे.

तथापि, या संदर्भात दि.०३.११.२०२० रोजी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या आदेशानुसार श्रीमती थोरात यांना पूर्वीच्या पदावर पुन्हा सेवेत घेण्यात आले आहे.

---

**जळगांव जिल्हा परिषद येथील ई-निविदा प्रक्रियेत भोंगळ कारभार होत असून बांधकाम विभागामध्ये सर्रास पदाचा होत असलेला गैरवापर**

**(३२) ३३७८१ (०६-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हा परिषदे मधील बांधकाम विभागात पदाचा गैरवापर करुन ई- निविदा प्रक्रियेत ई - निविदा ओपन होउन सर्व निविदा ओपन होऊन सुध्दा पदाधिका-यांच्या अर्जावर स्वतः जोखीम पत्करुन थेट निविदा प्रक्रिया कॅन्सल करण्याचा निर्णय घेतला जात असल्याची तक्रार माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान उपमुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. हसन मुश्रीफ (१६-०२-२०२२) :** (१), (२) व (३) जळगाव जिल्हा परिषद येथील ई-निविदा प्रक्रियेत भोंगळ कारभाराबाबत तक्रार करण्यात आली होती. शिंदाड ता. पाचोरा जि. जळगाव प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या विद्युतीकरणासाठी आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने १८.९९% प्राप्त झाली होती. तथापि, प्राप्त तक्रार पाहता यासंदर्भात तांत्रिकदृष्ट्या दर्जेदार व भारतीय मानक ब्युरोच्या मानकाप्रमाणे कामाबाबत संबंधित कमी दराच्या निविदाकाराकडून खुलासा मगविणेत आला होता. त्यानुसार न्युनतम निविदाकारास निविदा देण्यात आली. दरम्यान, सदर काम आमदारस्थानिक निधी विकास कर्यक्रम सन २०१९-२० अंतर्गत, मंजुर झालेले होते. प्रस्तुत कामास कार्यारंभ आदेश देण्यापुर्वीच जिल्हा नियोजन समितीकडून सदर काम रद्द करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ठाण्यासह आठ ठिकाणी सेंद्रिय प्रमाणीकरण कार्यालये सुरु करण्याबाबत.**

**(३३) ३३९२० (०७-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सेंद्रिय कृषी उत्पादनाचे प्रमाणीकरण जलद गतीने होण्यासाठी ठाण्यासह आठ ठिकाणी सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सेंद्रिय उत्पादनांचे प्रमाणीकरण जलद व सोपे होऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी शासनाने अपेडा अंतर्गत नॅशनल ॲक्रिडेशन मान्यता घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१०-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणा स्थापन करण्यासाठी ॲपेडा अंतर्गत मान्यता प्राप्त करुन घेण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सेंद्रिय प्रमाणिकरण यंत्रणेच्या नियामक मंडळावरील सदस्यांच्या नेमणुकीची कार्यवाही सद्यस्थितीत सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## पुणे जिल्हयातील पानशेत धरणाजवळील जांभली ते निळकंठेश्वर रस्त्याचे केवळ साडे सहाशे मीटर काम वन विभागाचे मान्यते अभावी रखडल्याबाबत

**(३४) ३४४६५ (०६-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पानशेत धरणाजवळील जांभली ते निळकंठेश्वर डोंगर पायथ्यापर्यंतच्या ४ कि.मी. रस्त्याचे कामांपैकी साडेतीन कि.मी. काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत करण्यात येवून केवळ साडेसहाशे मीटर अंतराचे काम वन खात्याच्या परवानगी अभावी रखडले असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभागाअंतर्गत वन खात्याच्या पुणे येथील कार्यालयास तसेच मा.मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडे प्रस्ताव पाठवून निळकंठेश्वर रस्त्याच्या कामाला परवानगी देण्याबाबत कळविण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यासाठी कोटयावधी रुपयांचा झालेला खर्च तसेच पुणे व नागपूर येथील वन विभागाकडे मान्यतेचा प्रस्ताव पाठवून सहा महिने होऊन अद्यापही वन विभागाकडून त्यास परवानगी देण्यात आली नसल्याचे (माहे ऑक्टोबर, २०२१) मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले तसेच, वन विभागाकडून साडेसहाशे मीटर अंतराच्या रस्त्याचे काम रखडल्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (संशोधन व विकास) अंतर्गत पुणे जिल्हयातील प्रजिमा-२७ जांभळी ते निळकंठेश्वर रस्ता, ता.हवेली या २.५० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम मंजुर असून सा.क्र.१/०० ते १/६५० या लांबीमध्ये वन विभागाची जमीन असून सदर लांबीमध्ये वन विभागाने काम करण्यास हरकत

घेतल्याने सदर रस्त्याचे काम करता आलेले नाही, उर्वरित लांबीमध्ये रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे.

वन विभागाच्या परवानगीसाठी सदर प्रस्ताव उपमहासंचालक (केंद्र) (Deputy Director General (Central)) यांचे कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास वन विभागामार्फत मंजुरी मिळाल्यानंतर या लांबीमध्ये रस्त्याचे काम करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षकांच्या कार्यालयात खासगी कर्मचाऱ्यांकडून सॅनिटायझरच्या सॅम्पल बॉटल सीलबंद केल्याबाबत**

**(३५) ३४७७९ (०६-०१-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षकांच्या कार्यालयात खासगी कर्मचाऱ्यांकडून सॅनिटायझरच्या सॅम्पल बॉटल सीलबंद केल्या जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त यांनी चौकशीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (३१-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी दि.०९.०४.२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार मे.हाऊसहोल्ड रेमेडिज प्रा.लि. या सॅनिटायझर निर्मिती करणाऱ्या आर.एस.-२ घटकाच्या सॅनिटायझरचे नमुने काढण्यात आले होते. बॅचनिहाय काढलेल्या नमुना बाटल्यांची संख्या जास्त असल्याने व त्यांची बॉक्समध्ये सरमिसळ झाल्याने त्याच कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक बॅचनिहाय नमुने फक्त व्यवस्थितपणे टेबलावर लावून देण्याचे काम केले आहे.
(२) सदर प्रकरणी वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी दिलेल्या सुचनेनुसार, संचालक (अंमलबजावणी व दक्षता), राज्य उत्पादन शुल्क व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर यांनी चौकशी केली असून, चौकशीमध्ये सॅनिटायझरबाबत कोणताही गैरप्रकार/ नियमबाहय कृत्य घडलेले नसून, सॅनिटायझरचे नमुने काढण्याचे कामकाज नियमाप्रमाणे झाले असल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सात्रा-पोतरा (ता.केज, जि. बीड) येथील साठवण तलावाचे अर्धवट काम आणि शेजारील कुंभारी गावच्या पुनर्वसनाबाबत**

**(३६) ३४८३७ (०५-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सात्रा-पोतरा (ता.केज, जि. बीड) येथील मंजूर साठवण तलावांच्या कामांची मुदत संपून देखील कामे पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तलावाशेजारील कुंभारी गावचे पुनर्वसन अद्यापही झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सात्रा-पोतरा साठवण तलावाशेजारील कुंभारी गावचे पुनर्वसन लवकरात लवकर करावे आणि लाभार्थ्यांची यादी जाहिर करावी अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुससार सात्रा-पोतरा साठवन तलावाचे अर्धवट काम आणि शेजारील कुंभारी गावच्या पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (११-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे, पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) होय.

(४) सात्रापोत्रा तलावाचे घळभरणीचे काम पुनर्वसना अभावी प्रलंबीत आहे. जुन्या गावठाणाचा रु.८.२२कोटीचा निवाडा उपजिल्हाधिकारी भुसंपादन (जायकवाडी प्रकल्प) बीड यांनी निश्चित केला असुन रू. ६.९४ कोटी उपजिल्हाधिकारी भुसंपादन जायकवाडी प्रकल्प यांना जमा करण्यात आलेला असुन पुनर्वसनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर महानगरपालिकेच्या उपायुक्तांना अश्लिल शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत**

**(३७) ३४९४८ (०७-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर महानगरपालिकेच्या सभेत दोन्ही गटांच्या नगरसेवकांमध्ये मारामारी झाल्यानंतर उपायुक्त यांच्या कक्षात जाऊन काही नगरसेवकांनी अश्लिल शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी उपायुक्त यांनी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने दोषींवर कारवाई करण्याबाबत शाासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) उक्त प्रकरणी उपायुक्त, महानगर पालिका, चंद्रपूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीविरुध्द पो.स्टे.चंद्रपूर शहर येथे अप क्र.५९७/२१ कलम २९४, ५०६, १८६, भा.दं.वि. अन्वये दिनांक २९.०७.२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच सदर आरोपीविरुध्द ईस्तेगाशा क्रमांक ३०४/२०२१ (सि.सि.टी.एन.एस. कायमी क्रमांक ४५४/२०२१) कलम १०७, ११६(३) जाफौ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे. प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिगाव (ता.नांदुरा जि.बुलढाणा) भूसंपादन प्रकल्पातंर्गत कलम ११ व १९ लागू करताना आगाऊ रकमेची मागणी करण्याबाबत

**(३८) ३५११२ (०७-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिगाव (ता.नांदुरा जि.बुलढाणा) भूसंपादन प्रकल्पातंर्गत कलम ११ व १९ लागू करताना आगाऊ रक्कमेची मागणी करण्यात येऊ नये याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक २० जानेवारी २०१९ रोजी वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आगाऊ रकमेची मागणी रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२४-०१-२०२२) :** (१) प्रस्तूत विषयाबाबतचे निवेदन या कार्यालयात वा मा.मंत्री, महसूल यांचे कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२ व (३) भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम १९(२) अन्वये भुसंपादन करणाऱ्या यंत्रणेकडून रकमेचा भरणा केल्या शिवाय भुसंपादनाची कार्यवाही सुरु केली जात नाही.

---

## कृषी व संलग्न अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रिया जागेवरील प्रवेश फेरी (स्पॉट राऊंड) मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत

**(३९) ३५२३९ (०५-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी व संलग्न अभ्यासक्रम हे व्यावसायिक अभ्यासक्रम घोषित झाले असुन कृषी व संलग्न अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या नियमित चार फे-या होत असुन नंतर रिक्त जागेवरील प्रवेश फेरी इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाप्रमाणे महाविद्यालयांमार्फत न राबविता विद्यापिठामार्फत गुणानुक्रमानेच प्रवेश दिला जात असुनही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठामार्फत गुणानुक्रमाने पहिल्या ४ फेरीमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जात असुन स्पॉट राऊंड हा विद्यापिठाकडून घेतला जातो तरी विद्यार्थाना शिष्यवृत्ती मिळाली नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, स्पॉट राऊंड मधील विद्यार्थाना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-०२-२०२२) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मा.उपमुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.१२.०१.२०२१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील निर्देशानुसार सन २०२०-२१ मध्ये अतिरिक्त चौथी ऑनालाईन प्रवेश वाटप फेरी केंद्रभूत पध्दतीने राबविण्यात आली असून जागेवरील प्रवेश फेरीद्वारे (स्पॉट) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेशित आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे. यात संस्थास्तरावरील कोटा व संस्थास्तरावरील जागेवरील प्रवेश (SPOT) यांचा समावेश नाही. त्यामुळे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय असून जागेवरील प्रवेश फेरीद्वारे (Spot) प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

त्यानुसार चारही कृषि विद्यापिठांतर्गत कृषि व संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची (CAP) अंतीम फेरी संपल्यानंतर जागेवरील प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना (Spot) सन २०२०-२१ पासून शिष्यवृत्ती बंद करण्यात आली आहे.

(३) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पुर्वी जागेवरील प्रवेश फेरीद्वारे (Spot) प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांची पदवी पूर्ण होईपर्यंत सदर शिष्यवृत्ती योजनेचा लाभ वित्त विभागाच्या मान्यतेने अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जोगेश्वरी तसेच मुंबई शहर व उपनगरात अंमली पदार्थाच्या व्यसनाधीन होणाऱ्या तरुणांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत**

**(४०) ३५४४४ (१०-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) विधानसभा क्षेत्र तसेच मुंबई शहर व उपनगरात अंमली पदार्थांच्या तस्करीत तसेच सेवनात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील पूनम नगर, महाकाली गुंफा, दुर्गानगर, तक्षिला वाईन शॉप, श्री इच्छापूर्ती गणेश मंदिर मार्ग तसेच लिली व्हाईट हाऊस परिसर, गोदीवाला चाळ, प्रेमनगर परिसरातील इदगाह मैदान, पारसनगर, प्रजापूर पाडा, शिवाई मैदान, तसेच रस्त्यावर अवैधरित्या उभ्या करण्यात येणाऱ्या वाहनांवर कोणतीच कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सदरहू वाहने अवैधरित्या उभ्या असून अंमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्यामुळे तरुण व तरुणी व्यसनाच्या अधिन जात असल्यामुळे या प्रकरणाची कारवाई करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी पोलीस उपायुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक एमआयडीसी / मेघवाडी / जोगेश्वरी पोलीस स्थानक, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (वाहतूक), एम.आय.डी.सी. / जोगेश्वरी वाहतूक विभाग यांना माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर करुन बैठकीचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने उक्त प्रकरणी अंमली पदार्थांचे सेवन व विक्रीवर आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वाहतुकीच्या रस्त्यावर अवैधरित्या पार्क करण्यात येणाऱ्या ६१५ वाहनांवर माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये व नोव्हेंबर, २०२१ मध्ये एकूण २२३१ वाहनांवर ई-चलन मशीनमार्फत कायदेशीर कारवाई एमआयडीसी, वाहतूक यांचेमार्फत करण्यात आली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मार्फत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीमध्ये अवैधरित्या पार्क करण्यात आलेल्या वाहनांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यानुषंगाने एम.आय.डी.सी. वाहतुक विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(४) मुंबई जोगेश्वरी विधानसभा मतदार संघ परिसरात सन २०२१ मध्ये अंमली पदार्थ बाळगणाऱ्यांविरूध्द एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण १७ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण रू.७,८९,६७९/- किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. तसेच अंमली पदार्थ सेवानार्थीविरूध्द एकूण ७७ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ७७ आरोपितांना अटक करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे / शाखा येथे माहे ऑक्टोबर, २०२१ अखेर अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांविरूध्द एकूण ४७७ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ६०६ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. तसेच अंमली पदार्थ सेवानार्थीविरूध्द एकूण ४५१२ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये एकूण ४७२२ आरोपितांना अटक करण्यात आली आहे.

अंमली पदार्थांचे दुष्परिणाम व त्यामुळे समाजावर होणारा दुष्परिणाम याविषयी जनजागृती करण्यासाठी दि.२६.०६.२०२१ ते दि.१०.०७.२०२१ पर्यंत अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा साजरा करण्यात आला. मुंबई पोलीस ट्वीटर, इंन्स्टाग्राम व मुंबई पोलिस दलाच्या वेबसाईटवरून मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेतून घोषवाक्य व संदेश प्रसारित करण्यात आले आहेत. गर्दीची ठिकाणे, रेल्वे स्थानक, बस टर्मिनल, मार्केट परिसरात अनाऊन्समेंटद्वारे, पत्रके वाटून, बॅनर्स लावून जनजागृती करण्यात आली आहे. तसेच वेळोवेळी शाळा-महाविद्यालये येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीबाबत

**(४१) ३५४९६ (०७-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात अंमली पदार्थ विक्री व साठवणूकीच्या अनेक घटना घडल्याचे माहे आक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातून गांज्याची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीस स्थानिक खदान पोलीस स्टेशनच्या पथकाने सापळा रचून माहे आक्टोबर मध्ये वा त्यादरम्यान ताब्यात घेऊन दोन किलो गांजा जप्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अंमली पदार्थ विक्री करण्याऱ्या किती घटनांच्या नोंदीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२२-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.०९.१०.२०२१ रोजी खदान पोलीस स्टेशनला मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे एक व्यक्ती मोटारसायकलवरून अंमली पदार्थाची वाहतूक करीत असताना सापडल्याने त्याच्याकडून रू.४५००/- किंमतीचा १.१६०किग्रॅ गांजा पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे व एन.डी.पी.एस.ॲक्टप्रमाणे गुन्हा नोंदविला आहे.

(३) अकोला जिल्ह्यामध्ये अंमली पदार्थांच्या वाहतुक व विक्री यावर आळा घालण्यासाठी वेळोवेळी विशेष मोहिमेचे आयोजन करून माहे जानेवारी २०२१ ते ऑक्टोबर २०२१ अखेरपर्यंत एकूण ४४ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये ५४ आरोपितांना अटक करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडून रू.३२,०५,०५०/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषदेतील कर्मचारी यांच्या प्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत

**(४२) ३५५२७ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषदेतील कर्मचारी यांच्या प्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत मा.मु.का.अ. जिल्हा परिषद, रायगड अभ्यास समितीने दिनांक ६ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास सादर केलेल्या अहवालानुसार वेतनश्रेणी मंजूर होणे तसेच डॉ. दिपक म्हैसेकर यांच्या समितीने २००९ मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालानुसार निवृत्ती वेतन लागू करणे, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना उपदान योजना व विविध मागण्याचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदय, मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ३० जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना नगरपालिका व जिल्हा परिषदेतील कर्मचारी यांच्या प्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१४-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड अभ्यास समितीच्या अहवालात केलेल्या शिफारसी शासनाच्या विचाराधीन आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महात्मा गांधी तंटामुक्त योजनेबाबत

**(४३) ३५७१२ (१०-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी तंटामुक्त योजनेच्या परिणामकारकतेविषयी यशदा संस्थेने गृह विभागाकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अहवाल सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच जवळपास ६७% गावांना बक्षिसे देऊन झाली असून बक्षिसे देण्याऐवजी सीसीसी (कंडीशनल कॅश ट्रान्सफर) आधारित अनुदाने देण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१५-०२-२०२२) :**(१) महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेच्या मूल्यमापनासंदर्भात यशदा संस्थेचा प्रारुप अहवाल जून १७ मध्ये प्राप्त झाला आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत योजनेत काही सुधारणा प्रस्तावित करून सदर योजनेतंर्गत गठित राज्यस्तरीय समितीच्या मान्यतेने या सुधारणा करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे विचाराधीन आहे.

---

**ठाणे जिल्ह्यातील व भिवंडी शहरामध्ये सुरु असलेली अवैध मद्यविक्रीबाबत**

**(४४) ३६१८० (०५-०१-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील व भिवंडी शहरामध्ये विनापरवाना मद्यविक्री सुरु असून बेकायदेशीररित्या मद्य वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने राज्य शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे फेब्रूवारी २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहर परिसर, माणकोली, अंजुरफाटा, वडपे, अंबाड़ी, कोन सारख्या भागात मोठ्या गृहनिर्माण संस्था व लोकवस्तीमध्ये दुकाने, ढाबा, हॉटेल, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी विनापरवानगी व बनावट मद्यविक्री आणि बेकायदेशीर मद्य वाहतूक होत असताना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील व भिवंडी शहरामध्ये मोठया प्रमाणात सुरु असलेली विनापरवाना व बनावट मद्यविक्री आणि बेकायदेशीर मद्य वाहतूक थांबविण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना, तसेच कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१४-०२-२०२२) :** (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहर परिसर, माणकोली, अंजुर फाटा, वडपे, अंबाडी भागात लोकवस्तीमध्ये दुकाने, ढाबा, हॉटेल, रेस्टॉरंट इत्यादी ठिकाणी विनापरवानगी व बनावट मद्यविक्री आणि बेकायदेशीर मद्य वाहतूकीविरुध्द निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भिवंडी व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, ठाणे यांनी माहे एप्रिल, २०२० ते माहे मार्च, २०२१ व माहे एप्रिल, २०२१ ते दि.२६.११.२०२१ या कालावधीत वेळोवेळी कारवाई करुन खालीलप्रमाणे गुन्हे नोंद केलेले आहेत.

अ) निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भिवंडी यांनी एकूण ३७४ गुन्हे नोंदविले असून त्यामध्ये २०१ आरोपींना अटक करुन रु.१,२५,७९,६३३/- चा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

ब) निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, ठाणे यांनी एकूण २६१ गुन्हे नोंदविले असून त्यामध्ये ११९ आरोपींना अटक करुन रु.१,१८,५२,४६९/- चा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

क) तसेच, दि.१.१.२०२१ ते दि.२५.११.२०२१ या कालावधीमध्ये परमिट रुम, बीअर बार या आस्थापनांविरुध्द एकूण १३ नियमभंग प्रकरणे नोंदविली आहेत.

(४) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ठाणे यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय अधिका-यांचे कार्यक्षेत्र बदलून प्रत्येक आठवड्यात किमान २ मोहिमा राबविण्यात येतात. तसेच, अवैध मद्य विक्रीवर निर्बंध घालण्याकामी वेळोवेळी वाहनांची तपासणी केली जाते व रात्रीच्या वेळी गस्ती देखील घालण्यात येतात. हातभट्टी निर्मिती केंद्राच्या ठिकाणी विभागाचे संबंधित कार्यक्षेत्रीय

निरीक्षक, तसेच, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, ठाणे यांचेकडून वारंवार धाडी टाकून संबंधितांवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत गुन्हे नोंद केले जातात. त्याचबरोबर सराईत गुन्हेगारांकडून कलम ९३ अंतर्गत बंधपत्र घेण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक विभागात चिकनगुनियाचा व डेंग्यू या आजारांच्या साथीचा संसर्ग वाढत असल्याबाबत.**

**(४५) ३६२२१ (१०-०१-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक विभागामध्यं मागील पाच वर्षात कधीही आढळले नव्हते इतके म्हणजे तब्बल ८८२ चिकनगुनियाचे रुग्ण १० महिन्यांत आढळले आहेत. यातील सर्वाधिक ६३४ रुग्ण हे एकटय़ा नाशिक महापालिका हद्दीतील असुन दुसऱ्या विभागात डेंग्यूचे १० महिन्यात १४७९ रुग्ण आढळले असल्याचे आरोग्य सेवा नाशिक मंडळ कार्यालयाच्या अहवालावरून ही माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन्ही आजार डासांच्या माध्यमातून संसर्ग वाढवणारे असून या आजारांची साथ पसरु नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२२-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
नाशिक विभागामध्ये डेंग्यू, चिकनगुनियाचे जानेवारी, २०२१ ते नोव्हेंबर, २०२१ अखेर आढळून आलेले रूग्ण खालीलप्रमाणे.

| जिल्हा/मनपा | डेंग्यू -रूग्ण | डेंग्यू - मृत्यू | चिकनगुनिया |
|---|---|---|---|
| नाशिक जिल्हा | २६२ | ० | २६२ |
| नाशिक मनपा | १०८९ | ० | ७३१ |
| नाशिक विभाग | १८७० | १ | १०३३ |

(२) डेंग्यू, चिकनगुनिया हा आजार एडिस डासापासून होतो, हा डास साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्यामध्ये अंडी घालतो तसेच तो दिवसा चावत असतो. हा डास अंधाऱ्या खोलीमध्ये थंड जागेमध्ये लोंबकळणाऱ्या वस्तूंवर विश्रांती घेत असतो. त्यामुळे
नाशिक मनपामार्फत या डासाच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत-
• नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात ४ रूग्णालये व ३० शहरी आरोग्य सेवा केंद्रामधून औषधोपचार करण्यात येत आहे.
• नाशिक महानगरपालिकेतर्फे डासांची उत्पतिस्थाने त्वरीत नष्ट करण्यासाठी हेल्पलाइन नंबर ०२५३२३१७२९२, ९६०७४३२२३३ सुरू करण्यात आली आहे.
• विभागामार्फत डास प्रतिबंधात्मक कार्यवाहित बांधकाम व्यावसायिक व बेजबाबदार नागरिकांना सन २०२१ मध्ये ५५० केसेसमध्ये रक्कम रू. १,४०,०००/- दंड करण्यात आला आहे. तसेच व्यावसायिक व बेजबाबदार नागरिकांना ७१४ नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

निकामी भंगार, १०६१ टायर उचलण्यात आले आहे. ऑनलाइन तक्रारी ७५६६ प्राप्त झाल्या असून ७५५६ तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करून बंद करण्यात आलेल्या आहेत व त्यापैकी १० ऑनलाइन तक्रारींवर कार्यवाही चालू आहे.

• ६ मोठी व २८ लहान धुरफवारणी यंत्राद्वारे धुरफवारणी करण्यात येते.

या साथीच्या आजाराला आळा घालण्यासाठी खालील उपाययोजना नियमितपणे राबविल्या जातात.

• आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.

• साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.

• उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रूग्ण सर्वेक्षण.

• राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ४२ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.

• राज्यात गप्पीमासे पैदास केंद्र कार्यरत असून राज्यातील डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पीमासे सोडणे.

• नियमित किटकशास्त्रीय सर्वेक्षण.

• उद्रेकग्रस्त ठिकाणी किटकनाशकाची धूरफवारणी.

• शासकिय तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांचे डेंग्यु, चिकनगुनियारूग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.

• डेंग्यू, चिकनगुनिया रूग्णांना लक्षणाधारीत उपचार.

• सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.

• १६ मे हा दिवस राष्ट्रीय डेंग्यू दिवस तर जुलै महिना डेंग्यू विरोधी महिना म्हणून साजरा केला जाते.

• शालेय डेंग्यू जागृती मोहिम.

• उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय /राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी.

• विविध माध्यमांद्वारे जनतेस आरोग्य शिक्षण.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा वसंतनगर (जि.यवतमाळ) येथील परिसरात गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(४६) ३६२४५ (१०-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वसंतनगर (जि.यवतमाळ) येथील परिसरात मोठया प्रमाणात गौण खनिज असून मुरुमाचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार तोंडी व लेखी सुचना देऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांचे मनोबल प्रचंड वाढलेले असून निसर्गाचा ऱ्हास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सखोल चौकशी तसेच मोका पाहणी करुन अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतची मागणी निवदेनाद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०८-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मौजे वसंतनगर, ता. दिग्रस येथून राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१A च्या कामाकरीता ७४०० ब्रास मुरूम व दगड या गौण खनिज उत्खननाची परवानगी देण्यात आली होती. तथापि, याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दि.१.०२.२०२१ व दि.२१.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, दिग्रस यांना तांत्रिक मोजणी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा फुले कृषि विद्यापीठातील आधिका-यांना चुकीच्या वेतनश्रेणीचा लाभ मिळाल्याबाबत**

**(४७) ३६६३० (०७-०१-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा फुले कृषि विद्यापीठातील एकूण १४० आधिका-यांना चुकीच्या वेतनश्रेणीचा लाभ मिळाल्याने शासनाच्या तिजोरीतून सुमारे २२ कोटी रुपये जादा वितरित केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे कृषी महाविद्यालयातील १२ शिक्षणवर्गीय अधिकारी तसेच धुळे कृषी महाविद्यालयातील १६, कोल्हापूर कृषी महाविद्यालयातील १५, कराड महाविद्यालयातील ३ तसेच कोल्हापूरच्या विभागीय कृषी संशोधन केंद्रातील ९ जणांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१५-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. राज्यातील कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय यांना सहावा वेतन आयोग लागू करताना अतिप्रदान झाल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(३) कृषि विद्यापीठांतील शिक्षकवर्गीयांना झालेल्या अतिप्रदानाची वसुली करण्याबाबतचा शासन निर्णय दि.२४.८.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तथापि सदरहू शासन निर्णयाविरोधात मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात संबंधित रिट याचिका दाखल झालेल्या असून मा. न्यायालयाने अतिप्रदानाची वसूली करण्याची कार्यवाही करण्यास अंतरीम स्थगिती दिली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

### जोगेश्वरी (मुंबई) येथील एका तरुणाचा ठाणे कारागृहात संशयास्पद मृत्यू झाल्याबाबत

**(४८) ३६६५३ (१०-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (मुंबई) येथील १७ वर्षीय मुलीवर बलात्काराचा आरोप असलेल्या एका तरुणाचा ठाणे कारागृहात संशयास्पद मृत्यू झाल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तरुणाच्या शवविच्छेदन अहवालामध्ये मृत्यूचे कारण कोणते नमूद करण्यात आले आहे तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

न्यायाधीन बंदी विकास किसन अटवाल या बंद्याचा आजारी असल्याने मृत्यू झाला आहे.

(२) शवविच्छेदन अहवालानुसार फुफ्फुसदाह (Evidence of consolidation of lungs) मुळे मृत्यू झाला आहे. मृत्यूचे कारण स्पष्ट होणेकरीता हिस्थोपॅथलॉजी व व्हिसेरा अहवाल राखीव ठेवण्यात आलेला आहे. तसेच याबाबत मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं.8 ठाणे यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

### नागपूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून हत्येच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(४९) ३६६५४ (२४-११-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर जिल्ह्यात सन २०१८ या कालावधीच्या तुलनेत सन २०२० या कालावधीत हत्या करण्याच्या गुन्ह्यांमध्ये ३५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो यांनी दिलेल्या अहवालामध्ये स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सालात नागपूर जिल्ह्यात ७२ जणांची हत्या झाली असून हा आकडा वाढून आता ९७ वर गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हत्येच्या संख्येमध्ये इतकी वाढ होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच दोन वर्षात हत्येच्या संख्येत झालेली ३५% वाढ झाल्याने कायदा व सुव्यवस्था धोक्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी अशा प्रकारच्या हत्या रोखण्याकरिता कायदा व सुव्यवस्था स्थिती नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) व (२) नागपूर ग्रामीण पोलीस हद्दीत सन २०१८ मध्ये हत्येचे ३६ गुन्हे दाखल असून सन २०२० मध्ये हत्येचे ४३ गुन्हे दाखल आहेत. नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०१८ मध्ये हत्येचे ७३ गुन्हे दाखल असून सन २०२० मध्ये हत्येचे ९७ गुन्हे दाखल आहेत.
(३) नागपूर शहर व नागपूर ग्रामीण पोलीस अंतर्गत हत्येच्या संख्येमध्ये वाढ होण्यास जुने भांडणाचे कारणावरुन, प्रेमसंबध, चारित्र्य संशय, अनैतिक संबंध, कौटुंबिक वाद, दारु पिवून झालेला वादविवाद, पैशांचा/ उधारिचे पैसे/जागेचा वाद इत्यादी वाद, क्षुल्लक कारणावरुन झालेला वाद, भांडण झाल्याने इत्यादी कारणे दिसून आली आहेत.
(४) कायदा व सुव्यवस्था स्थिती नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
जेल मधून सुटणारे आरोपींवर लक्ष देणेकामी पथक कार्यान्वित असून दररोज सुटणारे आरोपींची यादी सर्व पोलीस स्टेशनला तात्काळ प्रसारीत करण्यात येते आणि नमूद आरोपींवर लक्ष ठेवण्यात येते. अभिलेखावरील सर्व गुन्हेगारांना तपासण्यात येते. संशयित हालचाली किंवा सराईत असल्याचे आढळल्यास प्रतिबंधक कारवाई करण्यात येते. अवैध शस्त्र जवळ बाळगणारे, शस्त्र घरी लपवून ठेवणारे अशा सराईत गुन्हेगारांविरुध्द मोहिम राबविण्यात येते. शरिराविषयक, मालमत्ता विषयक गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांबाबत गोपनिय माहिती काढून परिणामकारक कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई मुलुंड (पश्चिम) येथील जिल्हा ग्रंथालयाच्या इमारत दुरुस्ती बाबत

**(५०) ३६७३१ (१२-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मुलुंड (पश्चिम) येथील जिल्हा ग्रंथालयाच्या इमारतीत गळती होत असल्याने ग्रंथालय बंद ठेवले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारत दुरुस्ती बाबत तसेच ग्रंथालय तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१७-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
पावसाळयात इमारतीची गळती होत आहे. परंतू त्यामुळे ग्रंथालय बंद नाही. ग्रंथालय सेवा नियमित चालू असून वाचक त्याचा लाभ घेत आहेत.

(२) ग्रंथालय सुरु आहे. ग्रंथालय इमारत दुरुस्तीच्या अनुषंगाने आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.